# बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा, जि. नागपूर

## महाविद्यालयाविषयी

मोहपा परिसरातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना बारावीनंतर किमान पदवीपर्यंत शिक्षण मिळावे, यासाठी मोहपा एज्युके"ान सोसायटीचे तत्कालीन अध्यक्ष मा. बॅरि. शेषराव वानखेडे यांनी 1986 मध्ये पुढाकार घेतला होता. त्यांच्या अकाली निधनाने अपूर्ण राहिलेले त्यांचे स्वप्न कळमे"वर मतदार संघाचे तत्कालीन आमदार बाबासाहेब केदार यांच्या विशेष प्रयत्नाने व सहकार्याने लवकरच पूर्ण झाले. 30 नोव्हेंबर 1991 ला महाविद्यालयाला महाराष्ट्र शासनाची परवानगी मिळाली.

मागील 28 वर्षाच्या कालखंडात महाविद्यालयाने प्रगतीचा बराच पल्ला गाठलेला आहे. महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीकडे व्यवस्थापनाचे पूर्ण लक्ष असून मोहपा एज्युके"ान सोसायटीच्या स्वतःचे जागेवर महाविद्यालयाची स्वतंत्र वास्तू उभी आहे. सत्र 2009–10 पासून महाविद्यालयाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कायम संलग्नीकरण मिळाले आहे. याच सत्रात महाविद्यालयाचे वर्ग नवीन इमारतीत भरण्यास सुरुवात झाली.

महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. अजीत रविकांत जाचक हे नोव्हेंबर 2017 मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत 5 वर्षांच्या कालावधीकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अधिसभा आणि इंग्रजी अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून निवडून आले. तसेच मा. राज्यपाल, मध्यप्रदेश राज्य यांनी डॉ. बी. आर. आंबेडकर सामाजिक विज्ञान विद्यापीठ, महू, जि. इंदूर येथे इंग्रजी अभ्यास मंडळावर 3 वर्षांकरिता सदस्यपदी त्यांना नामित केले आहे.

महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख डॉ. प्रमोद आसाराम वडते यांना मागील शैक्षणिक सत्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळावर आगस्ट 2022 पर्यंतच्या काळाकरिता सदस्य म्हणून स्वीकृत करण्यात आले आहे.

महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. विनोद उत्तमराव भालेराव यांना मागील शैक्षणिक सत्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने ''शंकर पाटील यांच्या कथा : एक चिकित्सक अभ्यास'' या विषयावर आचार्य पदवी बहाल केली. **आता महाविद्यालयाचा जवळपास 100% शिक्षक वर्ग आचार्य पात्रता धारक आहे, ही महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.**

**<u>अभ्यासक्रमेतर उपक्रम</u>** : महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे 100 स्वयंसेवक क्षमतेचे पथक क्रियाशील असून त्या अंतर्गत शासकीय उपक्रमांसोबतच नवनवे उपक्रम राबविण्याचा पथकाचा सतत प्रयत्न असतो. रक्तदान शिबिर, ग्रामसफाई, गाजरगवत निर्मूलन, साक्षरता व सदभावना रॅली, सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण आदी उपक्रमात स्वयंसेवक सक्रिय योगदान देत असतात.

याशिवाय महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागामार्फत खेळाडूंना विविध आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांकरिता प्रशिक्षित करून सहभागी केले जाते. सदर खेळाडुंचा खर्च देखील महाविद्यालय करते. आतापर्यंत महाविद्यालयाने विविध क्रीडा प्रकारांमध्ये अनेक उत्तम खेळाडू दिले आहेत. महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग देखील सक्रीय असून विद्यार्थ्यांना त्यांच्यातील सुप्त गुणांना प्रदर्शित करण्याकरिता विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. दरवर्षी महाविद्यालयात दि. 23 ते 30 जानेवारी दरम्यान स्व. बॅरि. शेषराव वानखेडे पुण्यतिथीचे वेळी वादविवाद, वक्तृत्त्व, भावगीत गायन, काव्यगायन, गीतगायन, समूहगीत गायन, वाद्यवादन, रांगोळी, पुष्परचना, एकाकिका, नृत्य, वेशभूषा, इत्यादी व विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजनही करण्यात येते. याशिवाय राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या तसेच विविध दिन देखिल साजरे केले जातात.

व्यवस्थापनाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सुविधा व सोयी देण्याचा आमचा सदैव प्रयत्न असतो. महाविद्यालयाच्या विकासात आपले सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**डॉ. मा. वि. कोल्हे**
प्राचार्य

महाविद्यालयात बी.ए. (अनुदानीत) आणि एम.ए. मराठी व समाजशास्त्र (कायम विनाअनुदानोत) हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. **या** सर्व अभ्यासक्रमांकरिता आवेदन पत्र डाउनलोड करून, प्रिंटआऊट घऊन स्वहस्ताक्षरात भरुन आव"यक कागदपत्रांसह महाविद्यालयात सादर करावे. तसेच एम.ए.च्या अभ्यासक्रमांचे प्रवेश विद्यापीठमान्य सुविधा केंद्रामार्फतच होतील. **महाविद्यालयाचे नवे शैक्षणिक सत्र 15/06/2019 ला सुरू होत आहे.**

**प्रवेश पात्रता :**

अ. बी.ए. प्रथम वर्ष – महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची 12 वी (H.S.S.C.) किंवा रा.तु.म. नागपूर विद्यापीठाने मान्यता दिलेली इतर तत्सम परीक्षा उत्तीर्ण.

ब. बी.ए. द्वितीय वर्ष – रा.तु.म. नागपूर विद्यापीठाची प्रथम वर्ष (दोन्ही सत्र) कला परीक्षा उत्तीर्ण किंवा रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या नियमानुसार ए.टी.के.टी. सवलत प्राप्त.

क. बी.ए. तृतीय वर्ष – रा.तु.म. नागपूर विद्यापीठाची प्रथम वर्ष कलाशाखेची परीक्षा उत्तीर्ण आणि द्वितीय वर्ष कला शाखेची परीक्षा उत्तीर्ण किंवा रा.तु.म.नागपूर विद्यापीठाच्या नियमानुसार ए.टी.के.टी सवलत प्राप्त.

(रा.तु.म. नागपूर विद्यापीठ क्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांनी नागपूर विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र सादर करावे.)

**विषय : बी.ए. प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष : दोन आवश्यक विषय व तीन ऐच्छिक विषय (एकूण पाच विषय)**

**आवश्यक विषय :** 1) इंग्रजी (English) 2) मराठी (Marathi)

**ऐच्छिक विषय :** 3) भूगोल किंवा राज्यशास्त्र (Geography or Political Science)
4) मराठी वाङ्मय किंवा इतिहास (Marathi Literature or History)
5) अर्थशास्त्र किंवा समाजशास्त्र (Economics or Sociology)

**वि"ोष सूचना :**

विद्यापीठाने बी.ए. भाग 2 च्या विद्यार्थ्यांसाठी **पर्यावरणाचा अभ्यास** हा अनिवार्य विषय सुरू केला आहे. या विषयाची परीक्षा महाविद्यालय स्तरावर होते. यात ओ/ए/बी/सी अशी श्रेणी देण्यात येते. या विषयात उत्तीर्ण झाल्याशिवाय विद्यापीठाद्वार अंतिम वर्षाचा निकाल जाहीर करण्यात येत नाही आणि परिणामी पदवी प्रमाणपत्रही देण्यात येत नाही. बी.ए. भाग 2 च्या विद्यार्थ्यांनी डॉ. प्रमोद वडते यांच्या नेहमी संपर्कात राहावे.

## प्रवेश पात्रता

| एम.ए. प्रथम सत्र | एम.ए. तृतीय सत्र |
|---|---|
| 1) युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठातून स्नातक परीक्षा उत्तीर्ण<br>2) युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणतीही पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण<br>3) रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नियमाप्रमाणे इतर पात्र विद्यार्थी | रा.तु.म. नागपूर विद्यापीठातून संबंधित विषयात एम.ए. प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण/एटीकेटी सवलत प्राप्त विद्यार्थी |

## एम. ए. (मराठी) : विषय

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
|---|---|
| 1. मध्ययुगीन मराठी साहित्याचा इतिहास | 1. आधुनिक मराठी साहित्याचा इतिहास |
| 2. साहित्यशास्त्र | 2. आधुनिक कविता |
| 3. कादंबरी | 3. वैचारिक साहित्य |
| 4. विशेष ग्रंथकार : संत ज्ञानेश्वर | 4. संशोधनशास्त्र |
| **तृतीय सत्र** | **चतुर्थ सत्र** |
| 1. मध्ययुगीन कविता | 1. मध्ययुगीन आधुनिक गद्य |
| 2. मराठी भाषिक अभ्यास | 2. भाषाविज्ञान |
| 3. ग्रामीण साहित्य | 3. लोकसाहित्य |
| 4. साहित्य चळवळी | 4. स्त्रीवादी साहित्य |

**एम. ए. (समाजशास्त्र) : विषय**

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
|---|---|
| 1. Classical Sociological Thinking<br>2. Quantitative Methods in Social Research<br>3. Sociology of Social Movement<br>4. Social Problems in Contemporary India | 1. Classical Theoretical Foundations<br>2. Qualitative Methods in Social Research<br>3. Social Movement in India<br>4. Industry and Society in India |
| **तृतीय सत्र** | **चतुर्थ सत्र** |
| 1. Orientation in Sociological Theory<br>2. Sociology of Change and Development<br>3. Globalization and Society<br>4. Rural Society in India | 1. Recent Trends in Sociological Theory<br>2. Perspective on Indian Society<br>3. Education and Society in India<br>4. Rural Society in India: Issues and Problems |

## उपलब्ध सोयी

1) **राष्ट्रीय सेवा योजना (NSS)** : ज्या विद्यार्थ्यांना समाजसेवा करण्याची आवड आहे, त्यांना या योजनत सहभागी होता येईल. ग्रामीण विभागामध्ये रचनात्मक व विधायक कार्य करावे लागेल. याबाबत कार्यक्रम अधिकारी मार्गदर्शन करतील. विद्यार्थ्यांना नियमांचे पालन करावे लागेल. निवडीबाबत कार्यक्रम अधिकारी अंतिम निर्णय घेतील. रा.से.योत तसेच लोकसंख्या शिक्षण मंडळात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना 10 पैकी गुण देण्यात येतात.

2) **महाविद्यालयीन सहल** : महाविद्यालयातर्फे शैक्षणिक सहल आयोजित केली गेल्यास सहलीबाबत संपूर्ण अधिकार प्राचार्यांना किंवा संबंधित सहलप्रमुखास राहतील. सहलीचा संपूर्ण खर्च विद्यार्थ्यांना करावा लागेल.

3) **क्रीडासाहित्य** : विद्यार्थ्यांची खेळातील रूची वृद्धिंगत व्हावी व त्यांचे कौशल्य विकसित व्हावे म्हणून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकरिता विविध क्रीडा मैदाने व साहित्याची व्यवस्था केली आहे.

4) **व्यायाम”ााळा** : सत्र 2012–13 पासून महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क सुसज्ज व्यायामशाळा उपलब्ध करवून देण्यात आली आहे. **चालू शैक्षणिक सत्रापासून परिसरातील नागरिकांकरिता देखिल व्यायामशाळा खुली असेल.**

5) **ग्रंथालय** : ग्रंथालयातून अभ्यासक्रमाची व संदर्भ ग्रंथाशिवाय इतरही वाचनीय पुस्तके विद्यार्थ्यांना पुरविली जातात. जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा लाभ मिळावा, यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी खालील नियम पाळणे आवश्यक आहे.:–

i. प्रत्येक विद्यार्थ्याला ग्रंथालयातून दोन Borrower's Tickets (B.T.) मिळतील.
ii. प्रत्येक B.T. वर एकावेळी एकच संदर्भ ग्रंथ मिळेल.
iii. महाविद्यालयातील विद्यार्थ्याला जास्तीचा ग्रंथ हवा असल्यास त्यासंबंधी प्राचार्य किंवा सबंधित अधिव्याख्यात्याच्या शिफारसपत्रावर उपलब्धतेनुसार एक ग्रंथ जास्तीचा मिळू शकेल.
iv. ग्रंथालयाचे B.T. हरविल्यास रु. 25/– भरल्यानंतर डुप्लीकेट B.T. ग्रंथालयातून मिळेल.
v. पुस्तक फाटले किंवा हरविले किंवा पुस्तकावर अनावश्यक लिहिलेले आढळल्यास मूळ किंमतीच्या दीडपट रक्कम भरुन द्यावी लागेल.
vi. ग्रंथ बदलवून घेण्याची मुदत आठ दिवसांची राहील.
vii. विद्यापीठ परीक्षा संपल्यानंतर पाच दिवसाचे आत ग्रंथ परत करावेत. अन्यथा नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

## सामंजस्य करार

नुकतेच **महाविद्यालयाने महात्मा फुले स्टडी सर्कल मोहपा** यांच्याशी पुढील पाच वर्षांकरिता सामंजस्य करार करून त्याव्दारे **महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसोबतच परिसरातील इच्छुक तरुणांना विविध स्पर्धापरिक्षांसाठी मार्गद”ान करण्याच्या उद्दे”ााने महाविद्यालयात बॅरि. वानखेडे ॲकेडमी उघडून त्याअंतर्गत वर्ग घेण्याचे ठरविले आहे.**

**रा.से.यो. पथकाने मधुगंगा नागरी पत सहकारी संस्था मर्या., मोहपा** व महाविद्यालयाने **नगर परिषद, मोहपा** यांचेशी चालू शैक्षणिक सत्रापासून 5 वर्षांच्या कालावधीकरिता स्वतंत्र सामंजस्य करार केले असून त्याअंतर्गत मोहपा व सभोवतालच्या परिसरात दरवर्षी प्रत्येकी किमान दोन समाजोपयोगी व लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

## शुल्क (Fees)

**खालील तक्त्यांत दर्शविलेल्या शुल्काव्यतिरिक्त आवेदकाला Online प्रवेश नोंदणी शुल्क म्हणून रु. 100/- भरावे लागतील.**

विद्यापीठाचे शुल्क :

| अ.क्र. | शुल्काचा प्रकार | बी.ए. | | | एम.ए. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम | व्दितीय | तृतीय | प्रथम व व्दितीय सत्र | तृतीय व चतुर्थ सत्र |
| 1 | नामांकन अर्ज व नामांकन | 110 | — | — | — | — |
| 2 | वार्षिक | 125 | 125 | 125 | 125 | 125 |
| 3 | खेळ व क्रीडा | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 4 | अश्वमेध | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 5 | विद्यार्थी संघ | 05 | 05 | 05 | 05 | 05 |
| 6 | वैद्यकीय तपासणी प्रपत्र | 05 | 05 | 05 | 05 | 05 |
| 7 | विद्यार्थी कल्याण | 05 | 05 | 05 | 05 | 05 |
| 8 | विद्यार्थी वैद्यकीय मदत | 05 | 05 | 05 | 05 | 05 |
| 9 | विद्यार्थी सहाय्य | 05 | 05 | 05 | 05 | 05 |
| 10 | ई—सुविधा | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 11 | आपत्ती व्यवस्थापन | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 12 | पर्यावरण अभ्यास | 00 | 100 | 00 | 00 | 00 |
| | **एकूण (अ)** | **375** | **365** | **265** | **265** | **265** |

**महाविद्यालयाचे शुल्क :**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षण | 800 | 800 | 800 | 7729 | 7729 |
| 2 | प्रयोगशाळा (भूगोल) | 600 | 600 | 600 | 00 | 00 |
| 3 | ग्रंथालय | 200 | 200 | 200 | 400 | 400 |
| 4 | खेळ, क्रीडा व जिमखाना | 240 | 240 | 240 | 300 | 300 |
| 5 | अभ्यासक्रमेतर उपक्रम | 80 | 80 | 80 | 150 | 150 |
| 6 | वैद्यकीय तपासणी | 40 | 40 | 40 | 30 | 30 |
| 7 | शारीरिक कार्यक्षमता कसोटी | 40 | 40 | 40 | 30 | 30 |
| 8 | विद्यार्थी मदत | 60 | 60 | 60 | 100 | 100 |
| 9 | ओळखपत्र | 45 | 45 | 45 | 20 | 20 |
| 10 | वार्षिकांक | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 11 | मेंटेनन्स | 00 | 00 | 00 | 400 | 400 |
| 12 | विकास | 00 | 00 | 00 | 600 | 600 |
| 13 | प्रवेश | 00 | 00 | 00 | 200 | 200 |
| | **एकूण (ब)** | **2205** | **2205** | **2205** | **10059** | **10059** |
| | **एकूण (अ+ब)** | **2580** | **2570** | **2470** | **10324** | **10324** |

**विद्यापीठ परिपत्रकान्वये वरील फी मध्ये वाढ झाल्यास/नवीन फी लागू झाल्यास विद्यार्थ्यांकडून चालू सत्रात फरकाची रक्कम वसूल करण्यात येईल.**

## प्रवेशाचे वेळापत्रक

### बी.ए. प्रथम वर्ष (विद्यापीठाच्या सूचनेनुसार)

| | | |
|---|---|---|
| 1 | आवेदनपत्र ऑनलाईन भरून महाविद्यालयात सादर करणे | बारावीच्या निकालाचा दिनांक ते 20 जून 2019 |
| 2 | गुणवत्ता व प्रतीक्षा यादी जाहीर करणे | दि. 25 जून 2019 ला दुपारी 2.00 नंतर |
| 3 | गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचे प्रवेश | दि. 26 जून ते 3 जुलै 2019 |
| 4 | प्रतोक्षा यादीतील विद्यार्थ्यांचे प्रवेश | दि. 4 जुलै ते 6 जुलै 2019 |
| 5 | समुपदेशन व रिक्त जागांवरील प्रवेश | दि. 8 जुलै ते 10 जुलै 2019 |

### बी.ए. द्वितीय वर्ष :

बी.ए. प्रथम वर्ष (दुसरे सत्र) उन्हाळी परीक्षा 2019 चा निकाल लागल्यानंतर 10 दिवसांचे आत, अंतिम दिनांक 10/07/2019

### बी.ए. अंतिम वर्ष :

बी.ए. द्वितीय वर्ष (चौथे सत्र) उन्हाळी परीक्षा 2019 चा निकाल लागल्यानंतर 10 दिवसांचे आत, अंतिम दिनांक 10/07/2019

### एम.ए. प्रथम वर्ष (मराठी व समाजशास्त्र) :

बी.ए. अंतिम वर्ष (सहावे सत्र) उन्हाळी परीक्षा 2019 चा निकाल लागल्यानंतर 10 दिवसांचे आत, अंतिम दिनांक 10/07/2019

### एम.ए. अंतिम वर्ष (मराठी व समाजशास्त्र) :

एम.ए. प्रथम वर्ष (दुसरे सत्र) उन्हाळी परीक्षा 2019 चा निकाल लागल्यानंतर 10 दिवसांचे आत, अंतिम दिनांक 10/07/2019

## अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

भरलेल्या आवेदन पत्राच्या प्रिंटआऊटसोबत खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.

| डॉक्युमेंट | प्रवेश अर्ज | | शिष्यवृत्ती | | परीक्षा अर्ज | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मूळ प्रत | झेरॉक्स | मूळ प्रत | झेरॉक्स | मूळ प्रत | झेरॉक्स |
| टी.सी. | 1 | 2 | – | 1 | – | 1 |
| 12 वीची मार्कशीट | 1 | 2 | – | 1 | – | 1 |
| 10 वीची मार्कशीट | – | 1 | – | 1 | – | 1 |
| कास्ट सर्टीफिकेट | – | 1 | – | 1 | – | – |
| इनकम सर्टीफिकेट | – | 1 | 1 | – | – | – |
| नॉन क्रिमीलेयर सर्टीफिकेट | – | 1 | – | 1 | – | 1 |
| आधार कार्ड | – | 1 | – | 1 | – | – |
| व्होटर कार्ड | – | 1 | – | 1 | – | – |
| बँक पासबुकचे प्रथम पृष्ठ | – | 1 | – | 1 | – | – |
| राशन कार्ड | – | 1 | – | 1 | – | – |
| डोमिसाईल सर्टीफिकेट | – | 1 | – | 1 | – | – |
| पासपोर्ट साईज फोटो | 2 | – | 1 | – | 1 | – |
| आय् कार्ड फॉर्म | 1 | – | – | – | – | – |

- बी.ए. द्वितीय वर्षाला प्रवेश घेतांना बी.ए. प्रथम वर्षाच्या दोन्ही सेमीस्टरच्या मार्कशीट्स जोडाव्यात.
- बी.ए. अंतिम वर्षाला प्रवेश घेतांना बी.ए. प्रथम व द्वितीय वर्षाच्या चारही सेमीस्टरच्या परीक्षेच्या मार्कशीट्स जोडाव्यात.
- एम.ए. प्रथम वर्षाला प्रवेश घेतांना बी.ए. प्रथम, द्वितीय व अंतिम वर्षाच्या सर्व मार्कशीट्स जोडाव्यात.
- एम.ए. द्वितीय वर्षाला प्रवेश घेतांना एम.ए. प्रथम वर्षाच्या दोन्ही सेमीस्टरच्या मार्कशीट्स जोडाव्यात.

**टीप :**

- शिष्यवृत्तीस पात्र असणाऱ्यांना शिक्षण व प्रयोगशाळा शुल्क भरावे लागणार नाही.
- विद्यापीठात प्रथमच नामांकन करणाऱ्यांना नामांकन, मायग्रेशन शुल्क द्यावे लागेल.
- विद्यापीठ परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या सूचनेप्रमाणे वेळेवर घोषित करण्यात येईल.
- वरीलपैकी कोणत्याही शुल्कात बदल झाल्यास तसे सूचित करण्यात येईल.
- प्रवेश घेतेवेळी वर नमूद शुल्कापेक्षा कमी शुल्क आकारल्यास, फरकाची रक्कम महाविद्यालयात रोखी ने भरावी लागेल.

**प्रवेशाची पध्दत :**

1. प्रवेशार्थ तात्पुरती निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी सूचनाफलकावर लावण्यात येईल. त्याशिवाय आवेदकास त्याच्या प्रवेशाबाबतची माहिती भ्रमणध्वनीव्दारे देण्यात येईल.
2. आवेदकान सूचनाफलकावरील सूचनेप्रमाणे दिलेल्या मुदतीत, स्वखर्चाने प्रवेश समितीसमोर सर्व मूळ प्रमाणपत्रे घेवून उपस्थित राहावे.
3. प्रवेश घेतेवेळी मूळ प्रमाणपत्रे महाविद्यालयात सादर करावीत.
4. केवळ मुलाखतीमुळे प्रवेश नक्की झाला असे समजू नये.
5. मुलाखतीनंतर प्रवेशासाठी निवड झालेल्या आवेदकांनी त्याच दिवशी किंवा दिलेल्या मुदतीच्या आत आवश्यक ते शुल्क कार्यालयात भरावे, अन्यथा निवड रद्द होवू शकते.
6. बी.ए. भाग 2 ला प्रवेश घेताना प्रथम वर्षाला घेतलेले विषय कायम ठेवावे लागतील.
7. बी.ए. प्रथम वर्षाला प्रवेश घेताना (ठराविक प्रवेश संख्या पूर्ण झाल्यानंतर) प्रवेश समितीने दिलेले ऐच्छिक विषय स्वीकारावे लागतील.

**टीप :**

- प्रवेश प्राप्त झालेल्या विद्यार्थ्याला महाविद्यालयाचे सर्व शुल्क देणे आवश्यक आहे. शुल्काची संपूर्ण रक्कम भरल्यावरच महाविद्यालयाकडून विद्यार्थ्याला कोणतेही प्रमाणपत्र दिले जाईल.
- विद्यार्थ्याचा शिष्यवृत्तीचा अर्ज कोणत्याही कारणाने नामंजूर झाल्यास महाविद्यालयाचे संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

❖ शुल्क सवलतीस पात्र नसणाऱ्या विद्यार्थाकडून शिक्षण शुल्काचा मासिक हप्ता दर महिन्याच्या 10 तारखेपूर्वी भरला गेला पाहिजे. तसे न करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंड आकारण्यात येईल. शेवटच्या तीन महिन्यांचे शिक्षण व इतर शुल्क परीक्षेच्या आवेदनपत्रासोबत भरावेच लागेल.

❖ डुप्लीकेट टीसीवर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार नाही.

❖ कोर्स बदल करुन बी.ए. / एम.ए. ला प्रवे”ा घेणाऱ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार नाही.

**विशेष सूचना :**

1) आवेदन पत्र ऑनलाईन भरले म्हणजे प्रवेशाची हमी मिळणे नव्हे. तसेच आवेदनपत्राची प्रिंटआऊट व प्रवेश शुल्क महाविद्यालयाने स्वीकारणे म्हणजे प्रवेश देणे नव्हे. आवेदनपत्राची अंतिम तपासणी झाल्यावरच प्राधान्यक्रमाने प्रवेश मिळेल.
2) महाविद्यालयात स्व. बॅरि. शेषराव वानखेडे यांची आठवण म्हणून त्यांचा स्मृती दिन साजरा करण्यात येतो. त्या निमित्ताने विविध सांस्कृतिक, बौद्धिक व क्रीडा स्पर्धा घेण्यात येतात.
3) महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्यांच्या वागणुकीमुळे वर्ग किंवा कार्यक्रम सुरू असताना अडथळे आल्यास सदर विद्यार्थी / विद्यार्थिनींच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार प्राचार्यांना राहील.
4) विद्यार्थी परिषदेचे गठन, विद्यापीठ प्रतिनिधीची व विद्यार्थी मंडळाची निवड विद्यापीठाच्या सूचनेनुसार होईल.

**पालकांसाठी सूचना**

आपला / आपली पाल्य महाविद्यालयात नियमित येतो / येते काय? त्याची / तिची विषय तासिकांना नियमित हजेरी असते काय?, महाविद्यालयीन परीक्षेची त्याची / तिची तयारी कशो सुरू आहे? याबाबतीत पालकांनी सजग राहणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षक–पालक मेळाव्यात सहभागी होण्याव्यतिरिक्त पालकांनी अधून–मधून महाविद्यालयात येवून त्याच्या / तिच्या प्रगतीविषयी माहिती घ्यावी. महाविद्यालयाच्या विकासाकरिता आपण उपाययोजना सुचवाव्यात.

## रा. तु. म. नागपूर विद्यापीठ परीक्षा शुल्क

| परीक्षेचे नाव | परीक्षा शुल्क | प्रवेश घेतेवेळी भरावयाचे एकूण परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| बी.ए. प्रथम सत्र (इतर ऐच्छिक विषय) | 242 | 484 |
| बी.ए. दुसरे सत्र (इतर ऐच्छिक विषय) | 242 | |
| बी.ए. प्रथम सत्र (भूगोल) | 304 | 608 |
| बी.ए. दुसरे सत्र (भूगोल) | 304 | |
| बी.ए. तिसरे सत्र (इतर ऐच्छिक विषय) | 242 | 484 |
| बी.ए. चौथे सत्र (इतर ऐच्छिक विषय) | 242 | |
| बी.ए. तिसरे सत्र (भूगोल) | 304 | 608 |
| बी.ए. चौथे सत्र (भूगोल) | 304 | |
| बी.ए. पाचवे सत्र (इतर ऐच्छिक विषय) | 242 | 684 |
| बी.ए. सहावे सत्र (इतर ऐच्छिक विषय) | 442 | |
| बी.ए. पाचवे सत्र (भूगोल) | 304 | 808 |
| बी.ए. सहावे सत्र (भूगोल) | 504 | |
| एम.ए. प्रथम सत्र | 539 | 1078 |
| एम.ए. दुसरे सत्र | 539 | |
| एम.ए. तिसरे सत्र | 539 | 1278 |
| एम.ए. चौथे सत्र | 739 | |

## विद्यार्थ्यांकरिता महत्त्वाचे नियम

- प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्रासाठी (Identity Card) स्वतःचा फोटो (3 CM X 2.5 CM आकाराचा) त्यामागे स्वतःचे नाव लिहून आणावा व ओळखपत्राच्या विहित अर्जाला जोडावा.
- अपूर्ण किंवा त्रुटीपूर्ण कागदपत्रे असल्यास पूर्वसूचनेशिवाय प्रवेश अर्ज रद्द करण्यात येईल.
- प्रवेश घेते वेळी पूर्ण निर्धारित शुल्क भरणे आवश्यक राहील.
- खोटी प्रमाणपत्रे सादर केल्यास विद्यार्थी कायदेशीर कारवाईसाठी स्वतः जबाबदार राहील.
- दिलेल्या मुदतीचे आत प्रवेश न घेतल्यास प्रवेश रद्द समजण्यात येईल.
- डुप्लीकेट टी.सी. वर प्रवेश मिळणार नाही. एखाद्या वेळी डुप्लीकेट टी.सी. वर महाविद्यालयात प्रवेश देण्याबाबत प्रतिज्ञालेख (Affidavit) व शिक्षणात खंड पडल्याबाबतचे खंड प्रमाणपत्र, इतर पुरावे आदी सत्यता पडताळून पाहिल्यानंतर योग्य वाटल्यास सरतेशेवटी प्रवेश देण्याचा अंतिम अधिकार प्रवेश समितीस राहील.
- अनुत्तीर्ण विद्याथ्याला कोणत्याही वर्गात प्रवेश मिळणार नाही.
- महाविद्यालयातर्फे घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षेत उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
- विद्यार्थ्याला प्रत्येक विषयाच्या तासाला नियमितपणे हजर राहावे लागेल. प्रत्येक विषयासाठी किमान 80% उपस्थिती अनिवार्य आहे.
- राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) पथकातील स्वयंसेवकांसाठी विद्यापीठाच्या संबंधित विभागामार्फत निर्धारित केलेले नियम बंधनकारक राहतील.
- महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांने महाविद्यालय परिसरात असताना आपले ओळखपत्र लावणे आवश्यक आहे. ओळखपत्र हरविल्यास रु. 50/– भरून डुप्लीकेट ओळखपत्र देण्यात येईल.
- विद्यापीठात पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांची नवीन गुणपत्रिका (साक्षांकित सत्यप्रत) निकालानंतर त्वरीत कार्यालयात सादर करावी.
- विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय कार्यक्रमाचे वेळी महाविद्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
- महाविद्यालयाच्या इमारतीच्या भिंतींवर, परिसरात कोठेही विनापरवानगी पत्रके, पोस्टर्स, बॅनर्स लावणे किंवा भिंतीवर काही लिहीणे, धुम्रपान, पान, गुटखा आदी तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन/ आदान–प्रदान आणि अशा पदार्थांची विक्री करणे कायद्याने गुन्हा आहे. वरील नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्तीस अथवा विद्यार्थ्याला एकावेळी रु. 200/– दंड म्हणून आकारण्यात येईल.
- विद्यार्थ्याने गैरवर्तन केल्यास, वर्गात बसण्याऐवजी विनाकारण महाविद्यालयाच्या परिसरात आढळल्यास, पूर्वसुचनेशिवाय वर्गात दीर्घकाळ अनुपस्थित राहिल्यास, महाविद्यालयाच्या नियमांचे उल्लंघन, शिस्तभंग केल्यास अशा विद्यार्थ्याचा/विद्यार्थिनीचा प्रवेश रद्द करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांसाठी संबंधित माहिती वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येईल. ती त्यांना प्राप्त झाली असे समजण्यात येईल.
- भारत सरकार मागासवर्गीय शिष्यवृत्तीधारकांची वागणूक व शैक्षणिक प्रगती असमाधानकारक आढळून आल्यास, विद्यापीठ वार्षिक परीक्षेत गैरहजर असल्यास, संपात भाग घेतल्यास, गैरवर्तणूक, बेशिस्तपणा आढळून आल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर असल्याचे आढळून आल्यास, अशा शिष्यवृत्तीधारकास शिष्यवृत्ती देणे, नियमाप्रमाणे रद्द किंवा स्थगित करणे प्राचार्यांचे अधिकारात राहील व त्याबद्दलची माहिती संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यास कळविण्यात येईल.
- विद्यार्थ्यांनी शारीरिक क्षमता चाचणी व वैद्यकीय तपासणीस उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यास रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
- महाविद्यालयाच्या परिसरात/वर्गात मोबाईल (भ्रमणध्वनी संच) वापरता येणार नाही. मोबाईल वापरताना आढळून आल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- महाविद्यालयात विद्यार्थ्यांना दुसऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनोची रॅगिंग घेता येणार नाही. अशी घटना निदर्शनास आल्यास सर्वप्रथम संबंधित विद्यार्थ्याकडून खुलासा मागविण्यात येईल. खुलासा समाधानकारक नसल्यास, सदर विद्याथो/विद्यार्थिनी कायदे"ीर कारवाईस पात्र राहील.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अधिसूचना क्र. रातुमनावि/सा.प्र./06/स/549, दिनांक 16 जानेवारी, 2006 नुसार महाविद्यालयात कोणत्याही कार्यक्रमाची सुरुवात खालील विद्यापीठ गीताने करण्यात येईल.

## विद्यापीठ गीत

या भारतात बंधु भाव नित्य वसू दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे,
मतभेद नसू दे ।। धृ ।।

नांदोत सुखे गरिब–अमिर एक मतानी ।
मग हिंदू असो ख्रिश्चन, वा हो इस्लामी ।
स्वातंत्र्यसुखा या संकलांमाजि वसू दे।
दे वरचि अंसा दे ।। 1 ।।

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना
हो सर्वस्थळी मिळूनि समुदाय–प्रार्थना ।
उद्योगि तरुण वीर शीलवान दिसू दे ।
दे वरचि असा दे ।। 2 ।।

हा जातिभाव विसरुनिया एक हो अम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी ।
खळ निंदका मनीहि सत्य न्याय वसू दे ।
दे वरचि असा दे ।। 3 ।।

सौंदर्य रमो घर–घरात स्वर्गी ज्या परी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ति भीती बोहरी ।
तुकडयास सदा सर्वदा सेवेत कसू दे ।।
दे वरचि असा दे ।। 4 ।।